# नंदिनी नदी : कृती आराखडा

## नंदिनी नदी: संक्षिप्त परिचय

नंदिनी नदी ही अंजनेरी आणि सुपात्या टेकड्यांच्या उतारावरून उगम पावून तळेगाव अंजनेरी,महिरावणी, वासाळी, बेळगाव ढगा, तिरडशेत आणि नाशिक शहरातील विविध भागांतून वाहत टाकळी येथे गोदावरी नदीला मिळते. पावसाळ्यानंतर लगेच कोरडी पडणारी आणि शहरी-ग्रामीण भागात सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्याचे स्वरूप आलेली ही नदी पुढे गोदावरीच्या प्रदूषणास मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरते.

प्रमुख समस्या

- सांडपाणी व मैला: तुटलेल्या ड्रेनेज लाईन्स, चेंबर्स आणि थेट नदीपात्रात सोडले जाणारे नागरी सांडपाणी व मानवी विष्ठा.
- औद्योगिक व घातक कचरा: कान ओहोळ, लेंडी नाला, भागडी-चुंचाळे ओढ्यांमधून येणारे अॅसिडयुक्त/रासायनिक पाणी, ऑईल, भंगार बाजार आणि मटन मार्केटचे अवशेष.
- गाळ व जलवहनात अडथळे: नदीपात्रात आणि बंधाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर साचलेला गाळ, ज्यामुळे साठवण क्षमता घटली आहे.
- घनकचरा व प्लास्टिक: पुलांवरून आणि काठांवरून मोठ्या प्रमाणात टाकला जाणारा प्लास्टिक व घरगुती कचरा; शेण मिसळणे (उदा. शेणनाला).
- अतिक्रमण व अनैसर्गिक प्रवाह: ओढ्यांच्या पात्रांवर झालेले अतिक्रमण, ज्यामुळे पात्र अरुंद होऊन पुराचा धोका वाढला आहे.
- विदेशी वनस्पतींचा प्रादुर्भाव: माथ्यावरील भागात जलसंधारणास बाधा ठरणाऱ्या ग्लिरिसिडीया (Gliricidia) वनस्पतीचे वाढलेले प्रमाण.

प्रस्तावित कामांचे स्वरूप **(**ग्रामीण व शहरी**)**

१**.** माथा ते ओढा उपचार **(Ridge-to-Valley & Rural Works)**

- जलसंधारण संरचना**:** अंजनेरीच्या माथ्यावर सलग समपातळी चर (CCT / Deep CCT) आणि पाण्याचा वेग रोखण्यासाठी ९० हून अधिक लूज बोल्डर स्ट्रक्चर्स (LBS/गल्ली प्लग्ज).
- गाळ उपसा **(De-silting):** महिरावणी धरण, बेळगाव ढगा गावतळे, २१ वनतळी आणि ठाकूर, घुगे, संजय भावले, गामणे, बाबनराव ढगे या सिमेंट बंधाऱ्यांमधील गाळ काढणे व खोलीकरण.
- नवीन बंधारे व दुरुस्ती**:** मुंगी, पाटपाणी, लांब दहाड आणि शिवराम देवराम येथे नवीन बंधारे बांधणे व गळती दुरुस्त करणे.
- पर्यावरणीय पुनरुज्जीवन**:** ग्लिरिसिडीया हटवून स्थानिक प्रजातींची फळझाडे, बांबू आणि काठांचे संरक्षण करण्यासाठी 'वेटिव्हर' गवताची लागवड (सुमारे ६०,०००+ झाडे).



२**.** शहरी नदी पुनरुज्जीवन व प्रदूषण नियंत्रण **(Urban & Riverbed Works)**


- सांडपाणी प्रक्रिया**:** सर्वाधिक प्रदूषित नाल्यांवर (लेंडी नाला, कान ओहोळ, भागडी ओढा इ.) सांडपाणी प्रक्रिया केंद्र (STP / E-STP) उभारणे व तुटलेल्या ड्रेनेज लाईन्स दुरुस्त करणे.
- नाला**-**टॅपिंग व फायटोरेमेडीएशन**:** दूषित पाण्याचा प्रवाह अडवून 'कॅना लिली' व 'वेटिव्हर' गवताच्या साहाय्याने नैसर्गिक पद्धतीने जड धातू व नायट्रेट्सचे शुद्धीकरण (Nature-Based Solutions).
- कचरा नियंत्रण**:** पुलांवर संरक्षक जाळ्या (Trash Skimmers/Screens) बसवणे आणि नियमित कचरा संकलन यंत्रणा राबवणे.
- नदी सुशोभीकरण व जनसहभाग**:** उंटवाडी येथील 'नंदिनी कॉर्नर'च्या धर्तीवर भारतनगर व इतर ठिकाणी 'बायोडायव्हर्सिटी पार्क' उभारणे, संरक्षक गॅबियन वॉल बांधणे आणि 'नदी पथकां'ची स्थापना करणे.

अपेक्षित परिणाम


- स्थानिक भूजल पातळीत वाढ होणे.
- नदीचा प्रवाह उन्हाळ्यात (मे महिन्यापर्यंत) टिकून राहून बारमाही स्वरूप प्राप्त होणे.
- पुराचा वेग कमी होऊन नाशिक शहराचे संभाव्य पूरसंकटापासून रक्षण होणे.
- गोदावरी नदीमध्ये मिसळणारे प्रदूषण रोखून कुंभमेळा व दैनंदिन वापरासाठी नदीचे पाणी स्वच्छ राहणे.

## ग्रामपंचायत क्षेत्रांमधील कामांची जागानिहाय यादी

| नाव | फोटो | अपेक्षित काम |
|---|---|---|
| भागडी ओढ्यावरील ठाकूर बंधारा<br><br>Thakur Bandhara on Bhagdi Stream |  | - बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूंचा गाळ उपसणे (डीसिल्टिंग करणे).<br>- बंधाऱ्याला आवश्यक असलेले गेट/दरवाजा बसवणे.<br>- गाळ साचण्याचा वेग कमी करण्यासाठी व काठ मजबूत करण्यासाठी स्थानिक झाडे आणि विशेषतः 'वेटिव्हर' (खस) गवताची लागवड करणे. |
| भागडी ओढ्यावरील घुगे बंधारा<br><br>Ghuge Bandhara on Bhagdi Stream |  | - बांधकामाच्या दोन्ही बाजूंचा गाळ काढणे.<br>- बांधकामाची गळती दुरुस्त करणे.<br>- गाळ साचण्याचा वेग कमी करण्यासाठी आणि काठ मजबूत करण्यासाठी स्थानिक झाडे आणि गवताची, विशेषतः खस (वाळा) गवताची लागवड करणे. |
| भागडी ओढ्यावरील संजय भावले बंधारा<br><br>Sanjay Bhavale Bandhara on Bhagdi Stream |  | - वरच्या बाजूचा गाळ काढणे (उपसा करणे) गरजेचे आहे.<br>- मार्च ते एप्रिलपर्यंत पाण्याची उपलब्धता असणारे जिवंत भूजल स्रोत (जलधारक थर).<br>- गवताची लागवड केल्याने ओढ्यांमध्ये गाळ साचण्यापासून प्रतिबंध होतो, तसेच पावसाळ्यात भूजल पुनर्भरण होण्यास मदत होऊ शकते. येथे भूजल साठ्यांचा (अॅक्विफर) अभ्यास करणे फायदेशीर ठरू शकते. |

| | | |
|---|---|---|
| संतोषा ओढ्यावरील गामणे बंधारा<br><br>Gamne Bandhara on Santosha Stream |  | - बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूंचा गाळ उपसणे.<br>- गाळ रोखण्यासाठी आणि काठ मजबूत करण्यासाठी स्थानिक झाडे व 'वेटिव्हर' गवताची लागवड करणे. |
| संतोषा ओढ्यावरील बबनराव ढगे बंधारा<br><br>Babanrao Dhage Bandhara on Santosha Stream |  | - बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूंचा गाळ उपसणे.<br>- गाळ रोखण्यासाठी आणि काठ मजबूत करण्यासाठी स्थानिक झाडे व 'वेटिव्हर' गवताची लागवड करणे. |
| संतोषा ओढ्यावरील हिरामन ढगे बंधारा<br><br>Hiraman Dhage Bandhara on Santosha Stream |  | - बंधारा आणि काठ मजबूत करण्यासाठी मोठी दुरुस्ती व दगडी पिचिंग (Rock pitching) करणे.<br>- वरच्या बाजूचा (Upstream) मोठ्या प्रमाणावर गाळ उपसणे. |
| वाघोबा ओढ्यावरील बेळगाव ढगा गावतळे<br><br>Belgav Dhaga Gavtale on Vaghoba Stream |  | - १ लाख कोटी लिटर क्षमता असलेल्या या तळ्यातील गाळ काढणे आणि दगडी पिचिंग करणे.<br>- लगतच्या शेतकऱ्यांच्या सहभागाने तळ्याभोवती वृक्षलागवड करणे. |

| | | |
|---|---|---|
| भागडी आणि संतोषा ओढ्यांच्या वनक्षेत्रातील २१ वनतळी<br><br>21 [Forest Ponds]<br>in forest area on Bhagadi and Santosha streams |  | - तळ्यांमधील गाळ उपसणे.<br>- टप्प्याटप्प्याने ग्लिरिसिडीया वनस्पती काढून त्याजागी स्थानिक प्रजातींची झाडे लावणे. |
| संतोषा ओढ्यावरील दत्तू ढगे तळे<br><br>[Dattu Dhage Pond] on Santosha stream |  | - गाळ उपसणे आणि तळ्याचा आकार वाढवणे.<br>- यात जिवंत जलस्रोत असून एप्रिल अखेरपर्यंत पाणी उपलब्ध असते.<br>- जंगलालगत असल्याने आणि उन्हाळ्याच्या अखेरपर्यंत पाण्याचा हाच मुख्य स्रोत असल्याने वन्यजीव व पक्षी येथे नियमित येतात; त्यांच्या सुरक्षेसाठी तरतूद करणे उपयुक्त ठरेल. |
| महिरावणी गावातील महिरावणी धरण<br><br>[Mahiravani Dam] distilling in Mahiravani Village |  | - धरणातील गाळ उपसणे (डीसिल्टिंग).<br>- धरणाच्या परिघाभोवती वृक्षलागवड करणे. |
| मुख्य नदी प्रवाहावरील पाटपाणी बंधारा<br><br>[Patpani Bandhara] on main river stream |  | - बंधाऱ्याच्या संरचनेची दुरुस्ती करणे. |

<table>
<tr>
<td>मुख्य नदी प्रवाहावरील मुंगी बंधारा<br><br>Mungi Bandhara on Main river stream</td>
<td>
</td>
<td>- पाण्याचा वेग मंदावण्यासाठी आणि पाणी साठवण्यासाठी नवीन बंधारा उभारणे.<br>- काठ मजबूत करण्यासाठी काठांवर वृक्षलागवड करणे.</td>
</tr>
<tr>
<td>मुख्य नदीवरील लांब दहाड बंधारा<br><br>Lamb Dahad Bandhara on main river</td>
<td>
</td>
<td>- पाण्याचा वेग कमी करण्यासाठी आणि पाणी अडवण्यासाठी नवीन बंधारा उभारणे.<br>- पात्राची खोली आणि मजबूत काठ हे बांधकामासाठी उपयुक्त ठरतील.</td>
</tr>
<tr>
<td>मुख्य नदीवरील शिवराम देवराम बंधारा<br><br>Shivram Devram Bandahra on main river</td>
<td>
</td>
<td>- पाण्याचा वेग कमी करण्यासाठी आणि पाणी साठवण्यासाठी नवीन बंधारा उभारणे.</td>
</tr>
<tr>
<td>तळेगाव अंजनेरी येथील वृक्षलागवड क्षेत्र<br><br>Plantation site in Talegaon Anjaneri</td>
<td>
</td>
<td>- वृक्षलागवडीसाठी ग्रामपंचायतीची जागा उपलब्ध.<br>- किमान १५,००० झाडे लावता येणे शक्य.<br>- नंदिनी नदीच्या उगमस्थानाजवळ, थेट पाणलोट क्षेत्रात असलेली ही जागा आहे.</td>
</tr>
</table>

# नाशिक मनपा क्षेत्रांमधील कामांची जागानिहाय यादी

## चला जाणूया नदीला : नंदिनी नदी पाहणी - प्रमुख निरीक्षणे व सूचना

अशासकीय सदस्य उपस्थिती

- श्री राजेश पंडित
- श्री दत्तात्रय रामभाऊ ढगे
- श्री सोमनाथ मुठाळ
- श्रीमती अपर्णा कोठावळे
- श्री चंद्रकिशोर पाटील
- श्री मनोज साठे
- श्री योगेश कोठावळे
- श्री रोशन केदार
- श्री निलेश झंवर

---

१) पिंपळगाव बहुला: सिद्धेश्वर मंदिर परिसर

- मंदिर परिसरातील, गावाला विहिरीशी जोडणाऱ्या लहान पुलाखाली मोठ्या प्रमाणात घनकचरा व प्लास्टिक कचरा टाकला जात असल्याचे दिसून आले.
- मंदिराच्या पुढील भागातील पाण्याच्या टाकीला गळती लागली आहे.
- पोकलॅन मशीन ने गाळ काढून नदीपात्राचे  डीसिल्टिंग करणे गरजेचे आहे.
- त्याचबरोबर, मंदिराच्या आणि नंदिनी नदीच्या उत्तर बाजूने टाकण्यात आलेली सांडपाणी वाहिनी (ड्रेनेज लाईन) कार्यान्वित नाही.
- त्र्यंबक रोडवरील महामार्गाच्या पुलाखालीही मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा टाकला जात असल्याचे निदर्शनास आले.
- यावेळी सातपूर गावातील ज्येष्ठ नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी नदीला पुन्हा स्वच्छ व निर्मळ करण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शवली.
- हे मंदिर पिंपळगाव बहुला, तिरडशेत आणि बेलगावढगा या तीन गावांच्या सीमेवर वसलेले एक प्राचीन देवस्थान आहे. त्यामुळे या ठिकाणाचे सुशोभीकरण करून नदीला तिचे नाव दर्शवणारा फलक लावावा, अशा विविध मागण्या नागरिकांनी केल्या.



२) हाडाचा ओढा

- सिद्धेश्वर मंदिरापासून पुढे कोळीवाड्याजवळून जाणाऱ्या हाडाचा ओढ्याची पाहणी करण्यात आली.
- या ओढ्याचा उगम पाणी फिल्टर प्लांटजवळील विपश्यना केंद्राच्या डोंगरातून होतो आणि त्याचा नंदिनी नदीपर्यंतचा प्रवाह ३.७७ किलोमीटर लांबीचा आहे.
- या ओढ्यातील काही भागातील पाणी स्वच्छ असले तरी, विश्वासनगर (अशोकनगरचा पश्चिम भाग) परिसरातून काही प्रमाणात सांडपाणी यात मिसळत असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.
- त्यामुळे, पिंपळगाव बहुला येथील कोळीवाड्याजवळ हे पाणी नंदिनी नदीला मिळण्यापूर्वी त्यावर शुद्धीकरण प्रक्रिया केली जावी, अशी मागणी नागरिकांनी केली.
- पोकलॅन मशीनने गाळ काढून नाल्याचे डीसिल्टिंग करणे गरजेचे आहे.



---

३) तिरडशेत पूल परिसर

- पिंपळगाव बहुला भागातून पुढे जाताना तिरडशेत गावाच्या पुलाशेजारी असलेल्या भंगार दुकानांमधील काही अवशेष नदीपात्रात टाकून प्रदूषण करत असल्याचे दिसून आले.

---

४) शिवाचा ओहोळ

- सातपूर आणि पिंपळगाव बहुला या दोन गावांची पूर्वीची हद्द निश्चित करणारा हा ओढा 'शिवाचा ओहोळ' या नावाने प्रचलित आहे.
- याचा उगम पिंपळगाव बहुला येथील खंदळ माथ्यावरून होतो व त्याचा प्रवाह २ किलोमीटर इतका आहे.
- ओढ्यामध्ये विठ्ठल मंदिराच्या पुढील बाजूस (त्र्यंबक रोडजवळ) मोठ्या प्रमाणात प्लास्टिक व घरगुती कचरा फेकला जातो.

- याशिवाय, नदीला पाणी सोडणारी भूमिगत सांडपाणी वाहिनी (ड्रेनेज लाईन) अनेक ठिकाणी फुटली असून, त्यातून घाणेरडे व दुर्गंधीयुक्त पाणी थेट नदीत जात असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत स्पष्ट झाले.
- यावेळी अमृत पुलावरही प्लास्टिक कचरा व घाण आढळली. या पाहणीदरम्यान पिंपळगाव बहुला आणि तिरडशेत येथील नागरिक उपस्थित होते.
- पोकलॅन मशीनने गाळ काढून नदीपात्राचे, नाल्याचे डीसिल्टिंग करणे गरजेचे आहे.




---

५) चोर वडाचा ओढा

- या ओढ्याचा उगम तिरडशेत-बेलगाव हद्दीवरील एका जुन्या वडाच्या ठिकाणाहून होतो आणि त्याचा नंदिनी नदीपर्यंतचा प्रवाह २.०६ किलोमीटर आहे.
- मेदगे नगर आणि भोर टाऊनशिपच्या पश्चिम भागातून मोठ्या प्रमाणात सांडपाणी व काही रासायनिक अंश या ओढ्यातून वाहतात.
- अनेक ठिकाणी अतिक्रमणामुळे हा ओढा अरुंद झाला आहे. येथे प्लास्टिक व घरगुती कचरा टाकला जातो, तसेच काही दुकानदार गोण्या भरून कचरा टाकत असल्याचे निदर्शनास आले.
- पाण्याला प्रचंड दुर्गंधी येत असल्याने, या पाण्यावर प्रक्रिया करूनच ते नंदिनी नदीत सोडावे, अशी मागणी उपस्थित ग्रामस्थ श्री. नागरे, गामणे, साठे व बोडके यांनी केली.
- पोकलॅन मशीनने गाळ काढून नाल्याचे डीसिल्टिंग करणे गरजेचे आहे.




---

६) तिरडशेत ओढा

- तिरडशेत टेकडीतून उगम पावणाऱ्या या ओढ्याचा प्रवाह १.०७ किलोमीटर आहे.
- हा ओढा बहुतांशी तिरडशेतच्या ग्रामीण हद्दीतून वाहत असला तरी, नवीन झालेल्या 'एन.ए. प्रकल्पां'लगत असल्याने व हा प्रकल्प महानगरपालिका हद्दीत येत असल्याने नजीकच्या भविष्यात तो मोठ्या प्रमाणात प्रदूषित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यावर वेळीच आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली.
- पोकलॅन मशीनने गाळ काढून नाल्याचे डीसिल्टिंग करणे गरजेचे आहे.

---

७) भंदुरे-बंदावणे पूल

- त्र्यंबकरोडवरील शौर्यवाडा आणि जाधव संकुल यांना जोडणाऱ्या, नंदिनी नदीवरील या पुलाखाली व वरच्या बाजूस घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसले.
- नदीपात्रात आणि पुलावर प्लास्टिक व इतर प्रकारचा कचरा आढळून आला. यावर तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे नागरिकांकडून सांगण्यात आले.

---

८) भागडी-चुंचाळे ओढा

- बेलगावढगा येथील भागडी डोंगराच्या दक्षिणेकडील पाठीमागील बाजूने याचा उगम होतो आणि नदीपर्यंतचा प्रवाह ८.५५ किलोमीटर आहे.
- या ओढ्यात सांडपाणी व भंगार दुकानांचे अवशेष थेट सोडले जातात. तसेच, अतिक्रमणामुळे ओढा अरुंद झाला असून, त्यात केमिकलयुक्त पाणी, प्लास्टिक व इतर कचरा टाकला जात असल्याने प्रचंड दुर्गंधी पसरली आहे.
- या व इतर अनेक समस्या स्थानिक नागरिक श्री. मेदगे, निगळ, बंदावणे व इतरांनी मांडल्या. यावर लवकरात लवकर उपाययोजना करण्याची मागणीही त्यांनी केली.
- हा ओढा नंदिनी नदीला प्रदूषित करणारा एक महत्त्वाचा स्रोत असल्याने यावर E-STP (Effluent Sewage Treatment Plant) बसवणे आवश्यक आहे.




---

९) कान ओहोळ

- या ओहोळाचा उगम चुंचाळे (दुधाळ्या) डोंगरात होतो. पुढे सिमेन्स कंपनी टेकडीजवळून येणारा एक मोठा ओढाही याला मिळतो. याची एकूण लांबी ७.१५ किलोमीटर आहे.
- दाट नागरी वस्तीतून वाहत असल्याने सांडपाणी थेट यात सोडले जाते. तसेच, छोट्या-मोठ्या वैध-अवैध कंपन्यांचे सांडपाणी आणि कचराही यात टाकला जातो.
- खाडी आणि भंगार मार्केटचे अवशेष, ऑइलयुक्त पाणी, दुर्गंधी आणि अतिक्रमण अशा सर्व समस्या या ओहोळावर असल्याचे स्थानिकांनी अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिले.
- कान ओहोळ हा नंदिनी नदीला सर्वाधिक प्रदूषित करणाऱ्यांपैकी एक आहे. त्यामुळे यावर ESTP व इतर तंत्रज्ञानाचा वापर करून उपाययोजना कराव्यात आणि शुद्ध केलेले पाणीच नदीत सोडावे, अशी मागणी करण्यात आली.
- याप्रसंगी अधिकाऱ्यांनी सांगितले की, "सर्व औद्योगिक कंपन्यांसाठी ESTP यंत्रणा उभारण्याकरिता जागेची निश्चिती व इतर प्रक्रिया सुरू असल्याने लवकरच या समस्या सुटतील."
- यावर काही नागरिकांनी आक्षेप घेत नमूद केले की, "अवैधरित्या चालणाऱ्या छोट्या-मोठ्या कंपन्यांची कोणतीही माहिती उपलब्ध नसेल, तर हे प्रकल्प कितपत यशस्वी होतील, यावर शंका आहे."




---

१०) लेंडी नाला

- नंदिनी नदीला सर्वाधिक प्रदूषित करणारा नाला म्हणून लेंडी नाल्याची ओळख असल्याचे नागरिकांनी पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांना सांगितले.
- याचा उगम दुधाळ्या डोंगरावर असून, तिथेच याला 'Glaxo' उपनाला येऊन मिळतो. नदीपर्यंतचा याचा एकूण प्रवाह ८.७३ किलोमीटर आहे.
- शिवशक्ती चौक येथील पुलावर अधिकारी व नागरिक यांच्यात मोठी चर्चा झाली, ज्यात नागरिकांनी समस्यांचा पाढाच वाचला.
- या ठिकाणच्या दयनीय परिस्थितीची पाहणी करण्यासाठी अधिकाऱ्यांना नेण्यात आले. तुटलेल्या सांडपाणी वाहिन्या, नाल्याचा वळवलेला प्रवाह आणि मोठ्या प्रमाणात झालेले अतिक्रमण निदर्शनास आले.
- 'गॅबियन वॉल' तुटून तिची लोखंडी जाळी नाल्यात पडली आहे, ज्यात घरगुती कचरा व प्लास्टिक अडकल्याने अत्यंत किळसवाणे दृश्य दिसत होते.
- या नाल्याजवळ चर्चा स्थानिक नागरिकांनी चर्चा करताना नंदिनी नदीच्या प्रत्येक टप्प्यावर चोर वडाचा ओढा, भागडी चुंचाळे ओढा, कानओहळ,
- लेंडी नाला यांच्यात मोठ्या प्रमाणात अ□सिडयुक्त, रासायनिक पाणी तसेच भंगार बाजार अवशेष ओढ्यांच्या पात्रात येतात ही बाब अधोरेखित केली. त्यामुळे या सर्व ठिकाणी मोठ्या प्रमाणात घाण, दुर्गंधी, डास झाले आहेत. त्यामुळे ओढ्यांची आणि पर्यायाने नंदिनी नदीची जैवविविधता आणि नैसर्गिक संपत्तीची चे प्रचंड नुकसान होते आहे. शिवाय नागरिकांच्या आरोग्याला सुद्धा यामुळे धोका असल्याचे स्थानिकांनी नमूद केले. या बाबतीत लवकरात लवकर कारवाई सुरु करून नागरिकांच्या आरोग्याशी होणार खेळ थांबवावा अशी मागणी स्थानिकांनी केली.
- याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी मनिष महाजन यांनी लेंडी नाला व इतर प्रत्येक ओढ्यांचे बारकाईने सर्व्हेक्षण पाहणी करण्यात येईल आणि हे सर्व गैरप्रकार करणारे व्यवसाय थांबविण्यात येतील अशी सर्वांना खात्री दिली.




१२) सप्तश्रृंगी ओढा

- २ किलोमीटर प्रवाहाचा हा ओढा नंदिनी नदीला मोठ्या प्रमाणात प्रदूषित करतो. स्थानिक महिलांनी या त्रासादायक आणि दुर्गंधीयुक्त पाण्याबद्दलच्या व्यथा अधिकाऱ्यांसमोर मांडल्या.
- प्लेटिंग कंपन्यांचे अवशेष, इतर सांडपाणी आणि केमिकल या ओढ्यात येत असल्याची माहिती देण्यात आली.
- नदीलगतच्या सार्वजनिक शौचालयाचे आऊटलेट फुटल्याने मैला थेट नदीपात्रात मिसळत आहे, ज्यामुळे परिसरात प्रचंड अस्वच्छता पसरली आहे.
- काही लोक येथे कचरा टाकत असल्याने, कचराकुंडी (Dustbin) ठेवून तो घंटागाडीने नियमित उचलावा, असे महिलांनी सुचवले.
- "आम्ही स्वच्छता मोहिमेत सहभागी होऊ, पण आधी आमच्या ओढ्याला दुर्गंधीमुक्त करा," अशी मागणी महिलांनी केली.



१२) आय. टी. आय. पूल

- पुलालगत टाकला जाणारा कचरा आणि नदीपात्रात तयार झालेली धोकादायक बेटे पाहणीदरम्यान निदर्शनास आली.
- पुलाच्या पश्चिमेला दक्षिणेकडे वृक्षारोपणासाठी मोठी जागा उपलब्ध आहे. येथे वृक्षलागवड करून नदीची जैवविविधता वाढवावी, अशी सूचना नागरिकांनी केली.
- संरक्षक जाळ्या आणि विजेच्या दिव्यांची आवश्यकता असल्याचेही स्थानिकांनी सांगितले.




---

१३) गोरखनाथ पूल

- सातपूर स्मशानभूमीजवळ पश्चिमेला हा पूल आहे. पुलालगतचा कचरा उचलण्यात आला होता, परंतु येथे प्रचंड घाण आणि दुर्गंधी असते. त्यामुळे महानगरपालिकेने याकडे कायमस्वरूपी लक्ष देऊन स्वच्छता राखावी, असे नागरिकांनी सांगितले.
- स्मशानभूमीतील घाण आणि इतर साहित्य थेट नदीत टाकले जात असल्याचे दिसले. तसेच, सांडपाणी थेट नदीत येत असून काही चेंबर्स फुटल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणून दिले.
- पावसाचे पाणी वाहून गेल्यावर फेसाळ व दुर्गंधीयुक्त पाणी साचते, ज्यामुळे रोगराई पसरते, हेदेखील नागरिकांनी लक्षात आणून दिले.
- यावेळी उपस्थित श्री. घटोळ, निगळ, तिडके, काश्मीरे, भंदुरे व इतर शेतकऱ्यांनी सांगितले की, "पूर्वी या नदीच्या स्वच्छ पाण्यावर शेती व पिण्याचे पाणी अवलंबून होते. मात्र, प्रदूषणामुळे शेती संपुष्टात आली आणि पिण्याचा स्रोतही नष्ट झाला."
- या ठिकाणची अतिक्रमणे काढून शक्य तिथे वृक्षारोपण करावे, अशा सूचनाही नागरिकांनी केल्या.




---

१४) दादोबा पूल

- नंदिनी नदीवरील हा पूल मळे विभागांना जोडणारा प्रमुख दुवा आहे. पुलाच्या परिसरात प्रचंड घाण होती, जी नुकतीच साफ करण्यात आली होती.
- नदीपात्रात धोकादायक बेटे येथेही दिसून आली. स्थानिकांच्या मते, मटन मार्केट आणि भंगार मार्केटमधील अवशेष नदीपात्रात टाकले जातात.
- सेवा हॉस्पिटलचे डॉ. भगतसिंग पाटील हे येथे स्वच्छतेसंदर्भात कार्य करत आहेत.
- या ठिकाणीही वृक्षलागवडीसाठी उत्तम संधी असल्याची माहिती उपस्थितांनी दिली.
- "आम्ही प्रशासनाला सहकार्य करू, पण ही नदी पुन्हा पहिल्यासारखी स्वच्छ करा," अशी ग्वाही मोठ्या जनसमुदायाने दिली.
- येथून जवळच असलेल्या महादेववाडीतील शिवम टॉकीज (जुने पडीक) येथील सांडपाणी थेट नदीत येत असल्याची माहितीही देण्यात आली.




---

१७) मोरवाडी (गोविंदनगर) ओढा

- हॉटेल गेट-वे टेकडी परिसरातून उगम पावणारा हा ओढा मोरवाडी, अंबड पोलीस स्टेशन, विजयनगर, कांदे-खोडे मळा, उंटवाडीमार्गे गोविंद नगर असा प्रवास करून अशोक लिकर दुकानाच्या पुढे नदीला मिळतो.
- या ५.१५ किलोमीटरच्या प्रवासात ओढ्यावर प्रचंड अतिक्रमण झाले असून, त्यात सांडपाणी, प्लास्टिक व इतर कचरा टाकला जात असल्याची माहिती नागरिकांनी दिली.
- पुलावर मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचे ग्लास आढळले. याबाबत शेजारील मद्यविक्रेत्याला समज देण्यात आली असून, त्यांनी ते ठिकाण स्वच्छ करून अधिक सुशोभित करण्याचे आश्वासन दिले.
- शेजारील प्लास्टिक ग्लास विक्रेत्यानेही विक्री बंद करण्याचे आश्वासन नागरिकांना व स्वच्छता निरीक्षकांना दिले.
- या ओढ्यावर STP प्लांट बसवून व इतर जैविक उपाय करून शुद्ध केलेले पाणीच नदीत सोडावे, अशी सूचना नागरिकांच्या वतीने करण्यात आली.

---

१८) भारतनगर ओढा

- या ठिकाणी मनपा अतिरिक्त आयुक्त श्रीमती नायर, इतर अधिकारी व बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.
- रोशन केदार आणि निलेश झंवर यांनी लोकसहभागातून केलेल्या वृक्षारोपणाबद्दल, संवर्धनाबद्दल आणि स्वच्छता मोहिमेबद्दल माहिती दिली. त्यांनी हा भाग दत्तक घेऊन त्यावर दीर्घकाळ काम करत असल्याचेही नमूद केले.
- "हा भाग नाशिकच्या आणि नंदिनीच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू बनू शकतो," या त्यांच्या मताला आयुक्तांनी दुजोरा दिला व सर्वतोपरी सहकार्याचे आश्वासन दिले.
- या भागाला बांबूची तटबंदी करून 'नंदिनी जैवविविधता पार्क' (Bio-diversity Park) तयार करावे, अशी सूचना अतिरिक्त आयुक्तांनी उद्यान निरीक्षकांना केली.
- भारतनगर वस्तीतील अरुंद गल्ल्यांमध्ये घंटागाडी जात नसल्याने नागरिक नदीपात्रात कचरा टाकत असल्याचे समोर आले. त्यामुळे, लहान गाडीच्या साहाय्याने कचरा गोळा करून तो बाहेर काढावा, अशी सूचना आयुक्तांनी स्वच्छता विभागाला दिली.
- पोकलॅन मशीनने गाळ काढून नाल्याचे डीसिल्टिंग करणे गरजेचे आहे.




- भारतनगरच्या बाजूला, अटल दिव्यांग हॉस्पिटलच्या मागे असलेल्या सरकारी जागेवर वृक्षारोपण व सुशोभीकरण करावे, अशी सूचना नागरिकांनी मांडली.
- भारतनगरचा ओढा नदीत मिळण्यापूर्वी त्यावर नैसर्गिक जलशुद्धीकरण प्रक्रिया व्हावी, हा मुद्दाही नागरिकांनी मांडला.




---

१९) पखाल रोड पूल

- या पुलालगत चिकन-मटन वेस्ट, प्लास्टिक व इतर घनकचरा टाकला जात असल्याने येथे कायम दुर्गंधी असते, हे उपस्थितांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले.

- यावर आवश्यक उपाययोजना करून पूल व परिसर स्वच्छ ठेवण्याचे काम लवकरच हाती घेतले जाईल, अशी ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली.
- याठिकाणी पुलाला जाळ्या असूनही पुलाच्या कोपऱ्यांवर मोठ्या प्रमाणात कचरा पडतो. तसेच इथून पुढचे नदी पात्रात अनेक चेंबर फुटलेले आहेत ज्यातून मोठ्या प्रमाणात सांडपाणी पात्रात जाते. यातून दुर्गंधी आणि डास होत आहेत. याठिकाणी पुलाच्या बाजूने जाळ्या extend करण्याची आणि ब्लॅक स्पॉटच्या भागात वृक्ष लागवड आणि सुशोभीकरण करावे अशी सूचना नागरिकांनी मांडली.
- सतत पूर येऊन घरांमध्ये पुराचे पाणी शिरते, याठिकाणी मोठ्या प्रमाणात भराव टाकून नदी पात्र अरुंद केले आहे. याठिकाणी डिसील्टिंग करून संरक्षक गॅबियन वॉलची तातडीने गरज आहे.




---


२०) इस्कॉन नाला

- पाथर्डी फाटा परिसरातून उगम पावणारा हा नाला गुरु गोविंद सिंग कॉलेज, म्हसोबा मंदिर (वडाळा), अशोका हॉस्पिटलच्या दक्षिण बाजूने, नाशिक-पुणे महामार्ग ओलांडून इस्कॉन परिसरातून ७.२१ किलोमीटरचा प्रवास करून नंदिनी नदीला मिळतो.
- कचरा, अतिक्रमण आणि सांडपाणी या येथील प्रमुख समस्या असल्याचे उपस्थितांनी सांगितले.
- या नाल्याचे दूषित पाणी शुद्धीकरण करूनच नंदिनी पात्रात सोडावे, अशी मागणी करण्यात आली.

---

२१) अशोक सोनजे मार्ग (तपोवन लिंक रोड) पूल

- नंदिनी-गोदावरी संगमाच्या थोडे अलीकडे हा पूल आहे. येथे नदी खडकाळ भागातून वेगाने वाहते.
- या पुलाच्या परिसरात काही लोक कचरा व प्लास्टिक टाकत असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणले. तसेच, काही चेंबर्स फुटले असल्याचेही सांगितले.
- यावर लवकरात लवकर उपाययोजना केल्या जातील, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.
- पुलावर जाळ्या बसवण्याचे काम सुरू केले जाईल, असे नोडल ऑफिसर श्री. नितीन पवार यांनी स्पष्ट केले.
- येथे प्राचीन ग्रामदेवता आणि साती आसरा यांचे स्थान असल्याने हे एक श्रद्धेचे ठिकाण आहे. त्यामुळे लोकसहभागातून हे ठिकाण स्वच्छ ठेवण्याची ग्वाही नागरिकांनी दिली.




---

२२) नाशिक पुणे हायवे पूल (समाज कल्याण ऑफिस जवळ)

- या पुलाच्या परिसरात काही लोक कचरा व प्लास्टिक टाकत असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणले. तसेच, काही चेंबर्स फुटले असल्याचेही सांगितले.
- यावर लवकरात लवकर उपाययोजना केल्या जातील, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.
- पुलावर जाळ्या बसवण्याचे काम सुरू केले जाईल, असे नोडल ऑफिसर श्री. नितीन पवार यांनी स्पष्ट केले.




---

२३) रामदास स्वामी पूल

- प्राचीन, ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेल्या या ठिकाणी नंदिनी नदी अधिकच फेसाळलेली दिसते. नदीच्या मागील भागातील प्रदूषणावर उपाययोजना केल्यास येथील पाण्याची गुणवत्ता सुधारेल व दुर्गंधी कमी होईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.
- या भागात अधिक वृक्षारोपण व सुशोभीकरण करून त्याचे महत्त्व वाढवता येईल, अशा सूचना नागरिकांनी मांडल्या.

- या पुलावरही जाळ्या बसवण्याचे काम सुरू केले जाईल, असे नोडल ऑफिसर श्री. नितीन पवार यांनी सांगितले.

---

२४) शेणनाला

- वडाळा गावातून येणारा हा ओढा मोठ्या प्रमाणात शेणमिश्रित पाणी वाहून आणत असल्याने त्याला उग्र वास येतो.
- हा नाला अनेक ठिकाणी बंदिस्त केल्याने त्यात मिथेन वायू तयार होऊन दुर्गंध पसरत असल्याचे मनपा अभियंत्यांनी सांगितले.
- या दुर्गंधीचा आणि डासांच्या प्रादुर्भावाचा हजारो रहिवाशांना त्रास होत आहे. त्यामुळे बंदिस्त नाला मोकळा करून ही समस्या सोडवावी, अशी मागणी नागरिकांनी केली.
- नाल्याच्या संगमाजवळ काही शेतकरी शेण थेट पात्रात टाकत असल्याचे निदर्शनास आले. या ठिकाणीही संरक्षक जाळ्या बसवण्याची कारवाई सुरू केली जाईल, असे नोडल ऑफिसर यांनी सांगितले.




---

२५) नंदिनी-गोदावरी संगम, टाकळी

- मनपा हद्दीत १५ किलोमीटरचा प्रवास करून नंदिनी नदी गोदावरीला येऊन मिळते.
- यावेळी एक गंभीर बाब निदर्शनास आली की, तुलनेने स्वच्छ असलेल्या गोदावरी नदीला नंदिनी नदी मोठ्या प्रमाणात प्रदूषित करत आहे. त्यामुळे गोदावरीला निर्मळ ठेवायचे असेल, तर नंदिनी नदीवर मोठ्या प्रमाणात काम होणे अत्यंत गरजेचे आहे, असे मत नागरिकांनी व्यक्त केले.
- स्थानिक नागरिक, संबंधित अधिकारी आणि तज्ज्ञांनी दिलेली सर्व माहिती विचारात घेऊन नियोजनबद्ध, सातत्यपूर्ण आणि सर्वसमावेशक काम व्हावे, अशी आशा नागरिकांनी व्यक्त केली.
- याच संगमावर कुंभमेळ्याचे शाही स्नान होत असल्याने, नंदिनी स्वच्छता व शुद्धीकरण मोहीम सातत्याने राबवावी, अशी विनंती नागरिकांनी अधिकाऱ्यांकडे केली.
- शेवटी, सर्व नागरिक व अधिकाऱ्यांनी "नंदिनी माये की जय" असा नारा दिला आणि नंदिनीला अविरतपणे स्वच्छ प्रवाहित ठेवण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचा निर्धार केला.




---

२६) नंदिनी कॉर्नर (उंटवाडी पूल)

- याच पाहणी दौऱ्यादरम्यान चला जाणूया नदीला टीम तसेच महानगर पालिका अतिरिक्त आयुक्त श्रीमती नायर मॅडम यांनी नंदिनी कॉर्नर या जागेचे उदघाटन केले.
- या जागी पूर्वी फार मोठ्या प्रमाणात कचरा पडून हा एक मोठा गार्बेज डंप झाला होता पण श्री चंद्रकिशोर पाटील, विष्णू गटकळ आणि इतर स्थानिक रहिवाश्यांच्या प्रयत्नातून हा स्पॉट स्वच्छ करून इथे जाळ्या आणि भिंत बांधली गेली.
- या विभागाचे DSI संजय गांगुर्डे यांनी या ठिकाणी भिंतीवर स्वच्छतेचा संदेश देणारी चित्रे, एक लहानसा प्लॅटफॉर्म आणि बसायला बेंचेस, I LOVE NASHIK असा निऑन बोर्ड लावून आकर्षक असा नंदिनी कॉर्नर बनवला.
- श्रीमती नायर यांनी श्री चंद्रकिशोर पाटील, विष्णू गटकळ, DSI संजय गांगुर्डे यांच्यासह त्यांच्या सर्व टीमचा सत्कार केला. त्याचे उदघाटन केल्यावर या स्पॉटला मॉडेल स्पॉट म्हणून बघत असेच स्पॉट्स उंटवाडीचा दुसरा पूल, भारतनगर तसेच नंदिनी नदीच्या इतरही भागात बनवले जावेत अशा सूचना उद्यान, स्वच्छता आणि बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना केल्या.

